
क्र. १२३ पहिले वर्ष ८ जानेवारी २०२३

# रविवारची  उपासना

## सा. पहिला रविवार स्नानसंस्काराचा सण

### प्रस्तावना

पवित्र मिस्साबलीत सहभागी होण्यासाठी जमलेल्या सर्व भाविकांचे हार्दिक स्वागत.

आज देऊळमाता प्रभू येशूच्या स्नानसंस्काराचा दिवस साजरा करीत आहे. आपल्याला पापमुक्त करणारा, तारणारा, मसिहा पश्चात्तापाचा बाप्तिस्मा स्वीकारून आपल्या लोकांशी एकरूप झाला. येशूच्या स्नानसंस्काराने तो देवपुत्र आहे हे जनसमुदायाला प्रकट करण्यात आले. पवित्र आत्म्याने तो परिपूर्ण झाला. त्यामुळे त्याने मोहावर विजय मिळविला. आज ख्रिस्ताठायी स्नानसंस्कार स्वीकारून आपणदेखील मोहाशी सामना करू शकतो. तशी कृपा आणि ईश्वरी प्रेमाचा सुखद अनुभव आपल्या प्रत्येकाला यावा व स्नानसंस्काराद्वारे मिळालेल्या पवित्र आत्म्याच्या शक्तीने येशूचे प्रेषितकार्य करण्यास आपण प्रेरित व्हावे म्हणून आपण आजच्या पवित्र मिस्साबलीत प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या**

**मूक प्रार्थनेसाठी विराम**

हे प्रेमस्वरूप परमेश्वरा, आमच्या प्रार्थना ऐकून घे. तुझी इच्छा आम्हांला समजावी आणि धैर्याने व श्रध्देने आम्हांला त्याप्रमाणे वागता यावे म्हणून आम्हांला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

### पहिले वाचन

**यशया या पुस्तकातून घेतलेले वाचन** ४२:१-४, ६-७

**''पाहा, हा माझा सेवक आहे. त्याच्याविषयी माझा आत्मा संतुष्ट आहे.''**

प्रभू म्हणतो, ''पाहा, हा माझा सेवक, याला मी आधार आहे. पाहा, हा माझा निवडलेला, याच्याविषयी माझा जीव संतुष्ट आहे. याच्याठायी मी आपला आत्मा घातला आहे. तो राष्ट्रांना न्याय प्राप्त करून देईल. तो गवगवा करणार नाही. तो आपला स्वर उंच करणार नाही तो रस्त्यातून पुकारा करणार नाही. चेपलेला बोरू तो मोडणार नाही. मिणमिणीत वात तो विझवणार नाही. तो प्रामाणिकपणे न्याय प्रस्थापित करील. पृथ्वीवर न्याय स्थापीपर्यंत तो मंदावणार नाही व भंगणार नाही. द्वीपे त्याच्या धर्मशास्त्राची प्रतिक्षा करतात.

मी परमेश्वर आहे. मी न्यायानुसार तुला बोलावले आहे. मी तुझा हात धरला आहे. तुला राखले आहे. तू लोकांना करार व राष्ट्रांना प्रकाश देणारा असे मी तुला करीन. आंधळ्यांचे डोळे उघडावे, बंदिशाळेतून बंदिवानांस व अंधारात बसलेल्यांस कारागृहातून बाहेर काढावे म्हणून मी असे करतील.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

२८:१-४,९-१०

प्रतिसाद : **परमेश्वर आपल्या लोकांना शांतीचे वरदान देईल.**

१. अहो देवपुत्रांनो, परमेश्वराला श्रेय द्या.
परमेश्वराला गौरव व सामर्थ्य यांचे श्रेय द्या.
परमेश्वराला त्याच्या वैभवी नामाचे श्रेय द्या. पावित्र्याने युक्त होऊन त्याची आराधना करा.

२. परमेश्वराचा ध्वनी जलामधून प्रसरत आहे.
परमेश्वर जलाशयावर आहे. परमेश्वराचा ध्वनी प्रबल आहे. परमेश्वराचा ध्वनी प्रतापमय आहे.

३. वैभवशाली परमेश्वर गर्जना करतो.
त्याच्या मंदिरात महिमा असे ते म्हणतात. परमेश्वर जलप्रलयावर आरुढ होतो. परमेश्वर राजासनावर सर्वकाळ बसलेला आहे.

### दुसरे वाचन

**प्रेषितांची कृत्ये या पुस्तकातून घेतलेले वाचन** १०:३४-३८

**''नासरेथकर येशूला परमेश्वराने पवित्र आत्म्याचा अभिषेक केला.''**

पेत्रने बोलण्यास आरंभ केला आणि तो म्हणाला, ''देव पक्षपाती नाही, हे माझ्या पक्के ध्यानात आहे. तर प्रत्येक राष्ट्रात जो त्याची भीती बाळगतो व ज्याची कृत्ये नैतिक आहेत तो त्याला मान्य आहे. येशू ख्रिस्ताच्या (तो सर्वांचा प्रभू आहे) असे देवाने शांतीच्या सुवार्तेची घोषणा करताना आपले जे वचन इस्राएलच्या संततीस पाठवले ते हे. योहानने जो बाप्तिस्मा गाजवला त्यानंतर गालिलापासून प्रारंभ होऊन सर्व यहुदियामध्ये घडलेले गोष्ट तुम्हांला तर माहीत आहे. नाझरेथकर येशूला देवाने पवित्र आत्म्याचा व सामर्थ्याचा अभिषेक केला. तो सत्कर्मे करीत व सैतानाच्या सत्तेखाली असलेल्या सर्वांना तो बरे करीत फिरला. कारण देव त्याच्याबरोबर होता.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**मार्क ९:७**

**आलेलुया, आलेलुया!**

मेघातून अशी वाणी झाली की,
''हा माझा प्रिय पुत्र आहे, ह्याचे तुम्ही ऐका.''

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तय लिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन** ३:१३-१७

**''बाप्तिस्मा घेतल्यावर परमेश्वराचा आत्मा येशूवर उतरला.''**

योहानच्या हातून बाप्तिस्मा घेण्याकरिता येशू गालीलहून यार्देनवर

आला, परंतु योहान त्याला मना करीत म्हणाला, ‘‘आपल्या हातून मी बाप्तिस्मा घ्यावा, असे असता आपण माझ्याकडे येता हे कसे?’’ येशूने त्याला उत्तर दिले, ‘‘असू दे, कारण ह्या प्रकारे सर्व धर्माचरण पूर्ण करणे हे आपल्याला उचित आहे.’’ तेव्हा त्याने तसे होऊ दिले. मग बाप्तिस्मा घेतल्यावर येशू लागलीच पाण्यातून वर आला आणि पाहा, आकाश उघडले; तेव्हा त्याने परमेश्वराचा आत्मा कबुतरासारखा उतरताना व आपणावर येताना पाहिला आणि आकाशातून वाणी झाली हा ‘‘माझा पुत्र, मला परमप्रिय आहे, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे.’’

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक :** माझ्या बंधूभगिनींनो, अखिल मानवजातीचे तारण व्हावे अशी आमच्या परमेश्वरपित्याची इच्छा आहे. सत्याचे ज्ञान मिळवण्यासाठी तो आम्हांला पाचारण करतो. संपूर्ण अंत:करणाने आपण त्याच्याकडे प्रार्थना करू या.

**प्रतिसाद –** सुखी ठेव तू सर्वांना, देवा आमुची हीच प्रार्थना. (गायनात)

१. संपूर्ण जगात गरीबांवर होणारे अत्याचार, अन्याय थांबून, त्यांना माणूस म्हणून, सन्मानाने जगता यावे म्हणून, आपण प्रार्थना करू या.

२. संपूर्ण जगात ख्रिस्ताचा संदेश स्वीकारला जाऊन, शांती प्रस्थापित व्हावी म्हणून, आपण प्रार्थना करू या.

३. विविधतेने नटलेल्या आपल्या भारत देशातील, विविधतेतील एकता टिकून राहून, जातीय वादाला आळा बसावा, म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. ख्रिस्ताच्या मळ्यात कार्य करण्यासाठी आपल्या परिसरातील अनेक तरुण-तरुणींना, पुढे येण्यास पवित्र आत्म्याची प्रेरणा मिळावी म्हणून, आपण प्रार्थना करू या.

५. येणारे वर्ष आपल्या सर्वांना सुखा-समाधानाचे, आनंदाचे, भरभराटीचे व चांगल्या आरोग्याचे जावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

६. देशाच्या काना-कोपऱ्यात कार्य करणाऱ्या मिशनरी धर्मगुरू, धर्मभगिनी व धर्मबंधू ह्यांच्यावर, प्रभूचा आशीर्वाद असावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

७. आता आपण थोडावेळ शांत राहून वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

## समारोप

हे प्रेमळ परमेश्वरा, तू आमचा आधार आणि सामर्थ्य आहेस. तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक आणि श्रध्देने करीत असलेल्या आमच्या विनंत्या आज मान्य कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, आमच्या ह्या दानांचा स्वीकार कर. आम्हांला अधिक पवित्र कर. श्रध्दाभावनेने तुझ्याकडे करीत असलेल्या आमच्या विनंत्या मान्य कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे सर्वसमर्थ परमेश्वरा, पवित्र संस्काराने तू आम्हांला नवजीवन देतोस. प्रामाणिकपणे सेवाभावी जीवन जगून आम्हांला तुझे उतराई होता यावे म्हणून आम्हांला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

आजच्या उपासनेमधील वाचने नीतिमत्त्व ह्या विषयावर आपल्याला चिंतन करायला प्रवृत्त करतात. जुन्या करारामध्ये नीतिमत्त्व म्हणजे देवाने निश्चित केलेल्या जीवनपध्दतीनुसार जीवन जगणे, सदाचारी जीवन जगणे आणि देवाच्या कृपेवर विसंबून त्याची इच्छा स्वीकारणे असा होता. आजच्या पहिल्या वाचनात (यशया ४२:१-४, ६-७) नीतिमत्त्वाविषयीची वरील सर्व वैशिष्ट्ये देवाच्या निवडलेल्या सेवकाला लागू करण्यात आलेली आहेत व ती येशूठायी अधिक परिपूर्ण स्वरूपात प्रकट झालेली आहेत, असे ख्रिस्तसभा मानते. मात्र काही यहुद्यांनी नियमशास्त्राचे तंतोतंत पालन हा नीतिमत्त्वाचा गाभा मानला. त्यामुळे परराष्ट्रीयांसाठी देवराज्याचे दरवाजे बंद होण्याची शक्यता निर्माण झाली. आजच्या दुसऱ्या वाचनात (प्रे. कृ. १०:३४-३८) परराष्ट्रीयांवर पवित्र आत्मा उतरून त्यांचा बाप्तिस्मा होत असल्याचे वाचायला मिळते. त्याद्वारे नीतिमत्त्व ही संकल्पना अधिक व्यापक बनते. शुभवर्तमानामध्ये (मत्तय ३:१३-१७) येशू सर्व धर्माचरण (नीतिमत्त्व) पूर्ण होण्यासाठी बाप्तिस्मा स्वीकारायला पुढे येतो यावरून कोणत्याही सदाचरणामुळे किंवा नियमशास्त्राच्या पालनामुळे नव्हे तर नम्रपणे देवाच्या योजना स्वीकारण्यात नीतिमत्त्व दडलेले आहे असे सूचित केले जाते.

**आत्मपरीक्षण :** नीतिमत्त्वाविषयी माझी संकल्पना काय आहे? बाप्तिस्म्यामुळे मी जर नीतिमान ठरलो असेन तर माझ्या जीवनातील पापाच्या काळोखाचा अर्थ मी कसा लावायचा? ●●●

| जानेवारी २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | पहिला सप्ताह |
|---|---|---|
| सोम ०९ | कँटबरीचा सं. एड्रियन (हि) | : इब्री १:१-६/मार्क १:१४-२० |
| मंगळ १० | सं आगाथो थोमातुर्गस (हि) | : इब्री २:५-१२/मार्क १:२१-२८ |
| बुध ११ | सं थिओडोसियस (हि) | : इब्री २:१४-१८/मार्क १:२९-३९ |
| गुरू १२ | सं बेनेडिक्ट बिस्कॉप (हि) | : इब्री ३:७-१४/मार्क १:४०-४५ |
| शुक्र १३ | पॉयतिअर्सचे सं हिलरी (हि/पां) | : इब्री ४:१-५,११/मार्क २:१-१२ |
| शनि १४ | नॉलाचे सं फेलिक्स (हि) | : इब्री ४:१२-१६/ मार्क २:१३-१७ |

**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटकॅटिकल सेंटर
४ कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता**
**(योहान १:८)**
चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)